# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १३, १४, १५ /२०१२-१३ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बाळासो अर्जुन टेंगले ( तक्रार क्र. १३/१२-१३ )<br>मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |
| २) | श्री. राजू तात्यासो शिंदे (तक्रार क्र. १४/१२-१३ )<br>मु.पो. डफळापूर, ता. जत, जि. सांगली. | |
| ३) | श्री. सिकंदर चाँदसो मंगळवेढे, (तक्रार क्र. १५/१२-१३)<br>मु.पो. बिळूर, ता. जत, जि. सांगली | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या तिन्ही तक्रारी एकत्रित निकाली काढण्यात येत आहेत कारण की, त्या एकाच जत उप विभागातील असून प्रत्येक तक्रारीतील मागणी एकच आहे व वितरण कंपनीचा बचावही एकसारखाच आहे.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

केस क्र.१३/१२-१३

श्री. बाळासो अर्जुन टेंगले, मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग विरुध्द तक्रार दि. १२.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. ५९० येथे ७.५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १६.९.२०११ रोजी चलन रु. ८,१७५/- पावती क्र. ८७६२५२६ नुसार भरले व चाचणी अहवालही त्याचदिवशी दिला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ९.१.२०१२ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आजतागायत कुठलाही आदेश पारीत न केल्यामुळे मंचाकडे गाऱ्हाणे दाखल केले. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी मिळावी व कृती मानकानुसार विलंबाबद्दल भरपाईचे आदेश व्हावेत व अंमलबजावणी व्हावी.

वितरण कंपनीने आपल्या दि. २.५.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने दि. १६.९.२०११ रोजी चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. परंतु जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटर नाही असे आढळले. वितरण कंपनीकडे ज्या ग्राहकाने दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश आहेत. दि. ३१.३.२०११ च्या अगोदर चलन भरलेले एकूण ३८ लोकांचे लाईन ओढून कनेक्शन देणे बाकी आहे. तसेच दि. १.४.२०१० पासून आज अखेर ६४९ इतके ग्राहक पैसे भरुन प्रलंबित आहेत. श्री. टेंगले यांचे जेष्ठता यादीमध्ये २६० क्रमांकवर नांव आहे. दि.३१.३.२०११ पर्यंतची जेष्ठता यादी संपल्यानंतर पुढील यादी बाबत कार्यालयीन आदेश देवून काम करुन घेण्यात येत आहे. श्री. टेंगले यांचे काम हाती घेवून लाईन ओढून कनेक्शन देण्यात येईल असे म्हटले आहे. तसेच कृती मानके विनियम २००५ मधील कलम १२.२ नुसार कृती मानकामधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी मागणी केली आहे.

केस क्र १४/१२-१३

श्री. राजू तात्यासो शिंदे, मु.पो. डफळापूर, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. १२.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. १३८/१ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १.७.२०११ रोजी चलन रु. ५,०५५/- पावती क्र. ८७५०४३५ नुसार भरले व चाचणी अहवालही त्याचदिवशी दिला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ९.१०.२०१२ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आजतागायत कुठलाही आदेश पारीत न केल्यामुळे मंचाकडे गाऱ्हाणे दाखल केले. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी मिळावी व कृती मानकानुसार विलंबाबद्दल भरपाईचे आदेश व्हावेत व अंमलबजावणी व्हावी.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

वितरण कंपनीने आपल्या दि. २.५.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने दि. १.७.२०११ रोजी चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. परंतु जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटर नाही असे आढळले. वितरण कंपनीकडे ज्या ग्राहकाने दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश आहेत. दि. ३१.३.२०११ च्या अगोदर चलन भरलेले एकूण ३८ लोकांचे लाईन ओढून कनेक्शन देणे बाकी आहे. तसेच दि. १.४.२०१० पासून आज अखेर ६४९ इतके ग्राहक पैसे भरुन प्रलंबित आहेत. श्री. शिंदे यांचे जेष्ठता यादीमध्ये ९९ क्रमांकवर नांव आहे. दि.३१.३.२०११ पर्यंतची जेष्ठता यादी संपल्यानंतर पुढील यादी बाबत कार्यालयीन आदेश देवून काम करुन घेण्यात येत आहे. श्री. शिंदे यांचे काम हाती घेवून लाईन ओढून कनेक्शन देण्यात येईल असे म्हटले आहे. तसेच कृती मानके विनियम २००५ मधील कलम १२.२ नुसार कृती मानकामधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी मागणी केली आहे.

<u>केस क्र १५/१२-१३</u>

श्री. सिकंदर चाँदसो मंगळवेढे, मु.पो. बिळूर, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभागा विरुध्द तक्रार दि.१२.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. २७६ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १९.९.२०११ रोजी चलन रु. ५,०५५/- पावती क्र. ८७६२९२२ नुसार भरले व चाचणी अहवालही त्याचदिवशी दिला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ९.१०.२०१२ ला तक्रार दाखल केली. त्यामध्ये अंतर्गत कक्षाचे दि. १८.२.२०१२ ला आदेश आदेश पारीत झाला. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी मिळावी व कृती मानकानुसार विलंबाबद्दल भरपाईचे आदेश व्हावेत व अंमलबजावणी व्हावी.

वितरण कंपनीने आपल्या दि. २.५.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने दि. १९.९.२०११ रोजी चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. परंतु जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटर नाही असे आढळले. वितरण कंपनीकडे ज्या ग्राहकाने दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश आहेत. दि. ३१.३.२०११ च्या अगोदर चलन भरलेले एकूण ३८ लोकांचे लाईन ओढून कनेक्शन देणे बाकी आहे. तसेच दि. १.४.२०१० पासून आज अखेर ६४९ इतके ग्राहक पैसे भरुन प्रलंबित आहेत. श्री. मंगळवेढे यांचे जेष्ठता यादीमध्ये २६७ क्रमांकवर नांव आहे. दि.३१.३.२०११ पर्यंतची जेष्ठता यादी संपल्यानंतर पुढील यादी बाबत कार्यालयीन आदेश देवून काम करुन घेण्यात येत आहे. श्री. मंगळवेढे यांचे काम हाती घेवून लाईन ओढून कनेक्शन देण्यात येईल असे म्हटले आहे. तसेच कृती मानके विनियम २००५ मधील कलम १२.२ नुसार कृती मानकामधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी मागणी केली आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

प्रस्तुत तक्रारींची सुनावणी दि. ९.५.२०१२ ला मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वि.प.तर्फे श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता जत उप विभाग, श्री. भोसले, सहाय्यक अभियंता, कवठे महांकाळ उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी केस क्र.१३ - श्री. बाळासो अर्जुन टेंगले, मु.पो. कोसारी यांना दि. १५.६.२०१२ पर्यंत विद्युत पुरवठा देण्यात येईल, केस क्र. १४ - श्री. राजू तात्यासो शिंदे, मु.पो. डफळापूर यांना दि.३०.६.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्यात येईल व केस क्र. १५ - श्री. सिकंदर चाँदसो मंगळवेढे, मु.पो. बिळूर यांना दि. ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले. मंचासमोर वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंबाबद्दल ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश आहेत, तसेच कृती मानकामधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही, त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये असे प्रतिपादन केले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या तिन्ही तक्रारीमध्ये ग्राहकांनी मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकांनी मागणी केल्याप्रमाणे कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना नुकसान भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर :होय

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार व मंचासमोर वि.प.चे अधिकारी श्री. मैलापुरे यांनी मंचास कळविल्यानुसार या तिन्ही ग्राहकांनी चलन भरले आहे. वितरण वाहिनी विस्ताराचे काम आहे. त्यामुळे कृती मानके विनियम २००५ अधिनियम ४.५ नुसार ३ महिन्यात विद्युत पुरवठा देणे आवश्यक होते. चाचणी अहवाल तिन्ही तक्रारीत सादर केल्याचे म्हटले आहे, परंतु अहवालानुसार जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटार नाही असा बचाव घेतला आहे. त्या जागेच्या तपासणीचा तपशील लेखी स्वरुपात मंचासमोर हजर केला नाही किंवा तपासणीची सूचना ग्राहकास केली असल्यास, त्याचा पुरावा हजर केला नाही, केवळ विलंबाचे स्पष्टीकरणासाठी असा बचाव घेतला आहे. हे खरे की, दि. ३१.३.२०११ पर्यंत चलन भरलेल्या अनेक ग्राहकांचे अर्ज प्रलंबित असतील तसेच वि.प.च्या वरिष्ठ कार्यालयाने अशा ग्राहकांना वीज जोडणी दि. ३१.३.२०१२ पर्यंत देण्याचे आदेश केले असतील, परंतु कृती मानके मानकातील तरतुदीनुसार ग्राहकास मुदतीत विद्युत पुरवठा देणे आवश्यक होते. वि.प.च्या अंतर्गत प्रशासकीय कारणासाठी परिपत्रके /आदेश यामुळे कृती मानके मानकातील तरतुदीचे पालन करणे शक्य झाले नाही असे कंपनी म्हणू शकत नाही.पर्यायाने कृती मानके मानकातील तरतुदीची पूर्तता करण्यात वि.प.ला अपयश आले आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे केवळ जेष्ठता यादीवर पेड पेंडींग पुष्कळ आहेत या कारणासाठी तक्रारदार ग्राहकांस विद्युत पुरवठा करण्यास झालेला विलंब क्षमापित होऊ शकत नाही. कृती मानके विनियम व त्यासोबतच्या परिशिष्ट अ नुसार विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई मिळण्याचा ग्राहकाचा हक्क आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे. तसेच ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश मंच देऊ शकतो.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तसेच सेक्शन ४३ विद्युत कायदा २००३ नुसार ग्राहकाचा मागणी अर्ज परिपूर्ण झाल्यानंतर वीज जोडणी देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. वि.प.चे स्थानिक अधिकाऱ्यांनी केवळ जेष्ठतायादीचे कारण पुढे केले आहे, कुठलीही तांत्रिक अडचणी किंवा इतर कांही कमतरता असल्याचे मंचासमोर सांगितले नाही. असो. सहाय्यक अभियंता श्री. मैलापुरे यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे या तिन्ही ग्राहकांना केस क्र. १३ मध्ये दि. १५.६.२०१२, केस क्र. १४ मध्ये दि. ३०.६.२०१२ व केस क्र. १५ मध्ये दि. ३०.७.२०१२ या प्रमाणे विद्युत पुरवठा देण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. विलंबाबद्दल या तिन्ही तक्रारीमध्ये कृती मानकामधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे, परंतु या बाबत वि.प.चे अधिकारी मंचाचे समाधान करु शकले नाहीत. वितरण वाहिनी विस्तार असल्यामुळे ३ महिन्यात वीज जोडणी देणे आवश्यक होते, ती दिली गेली नाही. वि.प.ने विलंबापोटी दिलेली कारणे क्षमापित करता येणार नाही, ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे वि.प.वर ग्राहकास विलंबापोटी भरपाई देण्याची जबाबदारी येते. त्यामुळे मुद्दा क्र. २ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## **आदेश**

१) या तिन्ही तक्रारी मंजूर करण्यात येत आहेत.

२) वितरण कंपनी जत उप विभाग यांनी केस क्र.१३ मध्ये १५.६.२०१२, केस क्र. १४ मध्ये ३०.६.२०१२ व केस क्र.१२ मध्ये ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देवून विद्युत पुरवठा करावा व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) वितरण कंपनी जत उप विभाग यांनी या तिन्ही तक्रारदार ग्राहकांना कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ३ महिन्यानंतर वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम ग्राहकाला रोखीने द्यावी. त्याचा अहवाल मंचास द्यावा.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com